MHSO190003592026

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.३३/२०२६**
**विधी एंटरप्रायझेस तर्फे विशाल मोहनराव भोसले**
**विरुदध महाराष्ट्र सरकार**
**निशाणी क्र. १ खालील आदेश**

अर्जदार विधी एंटरप्रायझेस तर्फे विशाल मोहनराव भोसले यांनी प्रस्तुतचा अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ५०३ प्रमाणे दाखल करुन प्रस्तुत प्रकरणातील जप्त मारुती सुझुकी कपंनीची ERTIGA VXI CNG या वाहनाचा अंतरीम ताबा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. (सदर वाहनास यापुढे संक्षिप्त स्वरुपात ''जप्त वाहन'' असे संबोधण्यात येते.)

०२. आरोपी अर्जदाराचे असे कथन आहे की, सदर जप्त वाहनाचा क्रमांक एम.एच.४३/सीक्यु/५२४४, चेसीस नंबर MA3BNC62STAV15137, इंजिन नंबर K15CN9993877 हे अर्जदार मालकीचे असून कामती येथील पोलीसांनी गु.र.नं.५९/२०२६ अन्वये शस्त्र अधिनियम कलम ४ व २५ अंतर्गत सदरचे वाहन जप्त केलेला आहे.

०३. अर्जदार पुढे असे कथन आहे की, अर्जदार हे विधी एंटरप्रायझेस टुरिस्ट कंपनीचे मालक आहेत. जप्त वाहन टुरिस्ट कंपनीचे व्यवसायासाठी चालू वापरातील आहे. सदर जप्त वाहन कामती पोलीस स्टेशन येथील परिसरात बंद स्थितीत आहे. जप्त वाहन त्यांच्याकडे उघडयावर पडून राहिल्याने त्या वाहनाचे स्पेअर पार्टस् ऊन, वारा व पावसाने खराब होण्याची शक्यता असल्याने अर्जदाराचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे तो न्यायालयाने घालुन दिलेल्या अटींचे पालन करण्यास अर्जदार तयार आहे. अर्जदार जप्त वाहनाच्या मालकी संदर्भ वाहनाचे विवरणपत्र, वाहन तपशीलाची प्रमाणीत प्रत,

विम्याची प्रमाणीत प्रत, आधार कार्ड व प्रथम खबर अहवालाची छायांकीत प्रत अभिलेखावर दाखल केले.

**०४.** सरकारी अभियोक्ता यांनी निशाणी ०६ खाली सदर अर्जाचे म्हणणे दाखल करुन असा विरोध केला की, सदन गुन्हयातील वाहन तुकाराम गायकवाड यांच्या कडून जप्त करण्यात आलेली आहे. अर्जदार व आरोपी यांच्यामध्ये जप्त वाहनाबाबत कोणताही संबंध नाही. अर्जदारास वाहन परत केल्यास तो अशाच प्रकारचा गुन्हा करण्याची दाट शक्यता आहे तसेच पुरावे नष्ट होण्याची शक्यता आहे. अर्जदार हे जप्त वाहनाचे मालक असल्याबाबत आर.सी. बुक दाखल केले नाहीत. सबब, सरकारी अभियोक्ता यांनी प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

**०५.** तपासी अंमलदार यांनी नि.०५ खाली म्हणणे देवून अर्जास विरोध केला आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे अर्जदार यांची कार आरोपी क्र.१ हा वापरत असून सदर कार परत दिल्यास तो अशाच प्रकारची शस्त्रे वाहनात वापरुन शरीराविषयी अथवा मालाविषयी गंभीर स्वरुपाचा गुन्हा करण्याची शक्यता आहे. अर्जदार यांना सदर वाहन परत दिल्यास ते मुंबई येथे राहणारे असल्यामुळे न्यायालयाच्या कामकाजावेळी हजर ठेवण्याची शक्यता वाटत नाही. आरोपीने गुन्हा घडतेवेळी नंबर प्लेट न लावता वापरत होता. त्यामुळे भविष्यात परत अर्जदार हे त्यांची कार आरोपीस देण्याची शक्यता असून सदरचे वाहन अर्जदार यांना परत न देण्याची विनंती केली आहे.

**०६.** प्रस्तुत प्रकरणातील अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, अर्जदाराने दाखल केलेल्या कागदपत्रावरुन तो वाहन क्र. एम.एच.४३/सीक्यु/५२४४ चे मालक असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते. सदर जप्त वाहन कामती पोलीस ठाणे येथे ठेवून

त्याचे नुकसान होणार आहे. सदर जप्त वाहनाचे मालक अर्जदार असलेबाबत योग्य तो पुरावा दिला आहे. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज काही शर्तीवर व अटींवर मंजूर होणेस पात्र आहे. सबब, खालील आदेश पारित करण्यात येतो.

**आदेश**

१) अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) पोलीस ठाणे कामती यांचेकडील गु.र.नं. ५९/२०२६ मधील जप्त मारुती सुझुकी कपंनीची ERTIGA VXI CNG या वाहनाचा क्र- एम.एच.४३/सीक्यु/५२४४, चेसीस नंबर MA3BNC62STAV15137, इंजिन नंबर K15CN9993877 या वाहनाचा अंतरिम ताबा अर्जदार यांना रक्कम रुपये १०,००,०००/- अक्षरी (दहा लाख रुपये) च्या सुपूर्दनाम्यावर खालील अटीच्या आधीन राहून देण्यात यावा;

अ) अर्जदाराने आवश्यकतेनुसार नमुद वाहन न्यायालयात अथवा तपासीक अंमलदार यांच्या समोर सादर करावे.

ब) अर्जदाराने सदरील वाहनाचा रंग आणि स्वरुप बदलु नये.

क) अर्जदाराने न्यायालयाच्या पूर्व परवानगी शिवाय सदरचे वाहन त्रयस्थ व्यक्तीस विक्री करु नये.

ड) तपासिक अंमलदार यांनी उपरोक्त वाहनाचे रंगीत छायाचित्र काढुन सविस्तर पंचनामा तयार करावा व अनुपालन अहवाल न्यायालयात सादर करावा.

३) संबंधीत लिपीक यांनी नियमाप्रमाणे पत्र पाठवावे.

SANTOSH VISHNU MUNDE

Digitally signed by SANTOSH VISHNU MUNDE
Date: 2026.05.08 16:31:42 +0530

तारीख : ०८/०५/२०२६

**(एस.व्ही.मुंडे)**

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, मोहोळ.

**<u>C E R T I F I C A T E</u>**

I affirm that the contents of this P.D.F. file of Judgment/Order are the same, word as per the original Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer - III | Sapana A. Madgundi |
| Name of the Court | Jt.C.J.J.C. & J.M.F.C., Court, Mohol. |
| Judgment dictated on | 08/05/2026 |
| Judgment signed by<br>the Presiding Officer on | 08/05/2026 |
| Judgment uploaded on | 08/05/2026 |